साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५
020-25538041 ते 44, Ext.no.414 commsugar.adm@gmail.com

जा.क्र.साआ/प्रशा-१/वाहन भाडेतत्व/५४९/२०२५
दिनांक ०७/०५/२०२५

## : मासिक भाडेतत्वावर वाहन पुरवठा करणेसाठी जाहिरात :

साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना टोयोटा इनोव्हा हायक्रॉस (इंधनासह) या प्रकारच्या वाहनाची आवश्यकता असलेने विनाचालक वाहन भाडेतत्वावर घेणेकामी खाजगी संस्था/ व्यक्ती यांचेकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | तपशिल | वार | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १. | जाहिरात प्रसिध्दी दिनांक व वेळ | बुधवार | दि.०७/०५/२०२५ सकाळी १०.०० वा.पासून |
| २. | फॉर्म स्विकृती सुरू दिनांक व वेळ | बुधवार | दि.०७/०५/२०२५ सकाळी ११.०० वा.पासून |
| ३. | पूर्व बैठक दिनांक, वेळ व ठिकाण | गुरूवार | दि.१५/०५/२०२५ सकाळी ११.३० वा. |
| ४. | फॉर्म स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | शुक्रवार | दि.१६/०५/२०२५ साय.५.३० वा. |
| ५. | फॉर्म उघडण्याची दिनांक व वेळ | सोमवार | दि. १९/०५/२०२५ सकाळी ११.३० वा. |

२. सदर जाहिरात https://mahasugar.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३. इच्छुक पुरवठाधारकांनी साखर आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे येथे फॉर्म फी रू.२,०००/- जमा केलेनंतर त्यांना फॉर्म उपलब्ध करून देण्यात येतील. सदरचे फॉर्म भरून समक्ष या कार्यालयात विहीत मुदतीत सादर करावेत. (पोस्टाद्वारे पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाही.)

४. पुरवठाधारकाने बयाणा रक्कम रु.१०,०००/- रकमेचा धनादेश/ धनाकर्ष "SAKHAR SANKUL VATNAVAL NIDHI" यांचे नावाने लिफाफा 'अ' सोबत करावा.

४. पुरवठाधारकाने एका स्वतंत्र मोठ्या लिफाफ्यावर त्यांचा तपशील (नाव, पत्ता इ.), फॉर्म क्र. नमुद करून त्यामध्ये लिफाफा 'अ' आणि 'ब' हे दोन्ही लिफाफे भरून या कार्यालयात सादर करावेत.

५. दरपत्रकाबाबतचे तसेच पुरवठाधारकाच्या निवडीबाबतचे सर्व अधिकार मा. साखर आयुक्त, पुणे यांचेकडे राखीव ठेवण्यात येत आहेत.

मा. साखर आयुक्त
यांचे मान्यतेने

Signed by
Kedaree Narayan Jadhav
(डॉ. केदारी नारायण जाधव)
Date: 07-05-2025 13:24:56
साखर संचालक (प्रशासन),
साखर आयुक्तालय, म.रा. पुणे.

## मा. साखर आयुक्त, पुणे यांचेकरिता भाडेतत्वावर एक टोयोटा इनोव्हा हायक्रॉस (इंधनासह व विनावाहक) हे वाहन घेण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

अटी व शर्ती :

१. दरपत्रक दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन सादर करावयाचे आहे. (लिफाफा 'अ' तांत्रिक लिफाफा व लिफाफा 'ब' वाणिज्यक लिफाफा)

२. लिफाफा अ मधील सर्व बाबींची पूर्तता केली असेल, तरच त्या दरपत्रकधारकाचा लिफाफा 'ब' उघडण्यात येईल.

३. दरपत्रकधारकाच्या वतीने निविद्देवर स्वाक्षरी करण्यास, निविदे संबंधिच्या बैठकांना उपस्थित राहण्यास किंवा तांत्रिक किंवा इतर माहिती पुरविण्यास एखाद्या व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास त्यासंबंधी दरपत्रकधारकाचे प्राधिकार पत्र (bidders power of attorney) देणे आवश्यक राहील.

४. दरपत्रकधारकाने दरपत्रक सादर करताना दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती, नियम या व्यतिरिक्त स्वत:ची अट दरपत्रकामध्ये समाविष्ट करु नये, अशा पध्दतीच्या सशर्त दरपत्रक विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५. दरपत्रका संदर्भात/दरपत्रक प्रक्रिये दरम्यान किंवा दरपत्रक स्वीकृती नंतर कोणताही विवाद निर्माण झाल्यास साखर आयुक्त कार्यालय, पुणे यांचा निर्णय अंतिम राहील.

६. दरपत्रकधारकाने दरपत्रक फॉर्म भरतांना अटी व शर्ती यांचे काळजीपूर्वक वाचुनच तदनंतच दरपत्रक फॉर्म भरावा. अपूर्ण माहिती असलेले दरपत्रक फॉर्म बाद करण्यात येईल.

७. दरपत्रक मंजूर करणे अथवा नाकारणे, आवश्यक वाटल्यास अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा किंवा दरासंदर्भात तडजोड (Negotiation) करणे बाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त, साखर पुणे यांचे कडेस राखून ठेवणेत आलेले आहेत.

८. बयाणा रक्कम किंवा सुरक्षा अनामत रक्कम यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

९. दरमहा किमान २००० कि.मी. पर्यंत वाहन वापरणेत येईल. त्यानुसार दर नमूद करावा. तसेच २००० कि.मी. च्या पुढे प्रति कि.मी. दर नमूद करावा. (चालकाशिवाय व इंधनासह)

१०. सदर दर सर्व देय करांसह नमूद करावेत.

११. इंधन/वंगण, वाहन दुरुस्तीचा व इतर वाहन खर्च पुरवठादारांस करावा लागेल.

१२. वाहनाचा वापर जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेर ग्रामीण भागात, डोंगराळ भागात, शहरी भागात केला जाईल.

१३. सदरचे वाहन साखर आयुक्त कार्यालयास दररोज २४ तास उपलब्ध करुन द्यावे लागेल (सार्वजनिक सुट्टयासहित)

१४. **पुरविण्यात येणारे वाहन दिनांक ०१/०१/२०२४ नंतर खरेदी केलेले असावे** व वाहनास परिवहन संवर्गात (permit) वाहतुकीचा परवाना असणे आवश्यक राहील.

१५. पुरवलेले वाहन नादुरुस्त झाल्यास किंवा इतर कोणत्याही कारणास्तव उपलब्ध न झाल्यास त्याऐवजी तात्काळ बदली वाहन देण्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

१६. पुरवठादारांस वाहन रद्द करावयाचे असेल तर साखर आयुक्त, कार्यालय पुणे यांचे कार्यालयास एक महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल, अन्यथा वाहन पुरवठादारा कडून एक महिन्याचे भाडेपट्टा दंड स्वरुपात वसूल केला जाईल.

१७. यशस्वी दरपत्रक धारकांने पुरवठा केलेल्या वाहनावर कोणत्याही कारणास्तव दिवाणी अथवा फौजदारी दावा न्यायालयात दाखला नसावा.

१८. साखर आयुक्त कार्यालयाने वाहन ताब्यात घेण्यापुर्वीच्या कालावधीतील RTO दंडाबाबत हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१९. वाहन चालकाने लॉगबुक अद्यावत करावे व ते मा. साखर आयुक्त. यांनी प्रमाणित केल्यानंतर देयक सादर करावे त्याशिवाय मासिक भाडे अदा केले जाणार नाही.

२०. पुरवठाधारकाने संबंधित वाहनाला फॉस्टॅग (Fastag) लावुन त्याबाबतचा तपशील लॉगबुक सोबत दरमहा सादर करावा. त्यास अनुसरुन फॉस्टॅग (Fastag) चे बील पुरवठाधारकास अदा करण्यात येईल.

२१. वाहन केवळ पुरवठाधारकाच्या अकार्यक्षमतेमुळे बंद राहिल्यास/ उपलब्ध न झाल्यास मासिक देय बीलामधून प्रतिदिनी पडणारे देय भाडे कपात करणेत येईल.

२२. निवड झालेल्या पुरवठाधारकाने आदेशाचे तारखेपासून १५ दिवसांच्या आत रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर केले पाहिजे.

२३. निवड झालेल्या पुरवठाधारकाने आदेश प्राप्त होताच ७ दिवसाचे आत वाहन उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. वाहन उपलब्ध करुन न दिल्यास त्यांचे आदेश रद्द करणेत येईल.

२४. दरपत्रक/ फॉर्म पात्र झालेनंतर पुरवठाधारकाने अनामत रक्कम रु.२०,०००/- धनाकर्ष/ धनादेश ७ दिवसाच्या आत या कार्यालयात जमा करावा. अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

२५. करारनामा मुदतीच कालावधीत पुरविलेल्या वाहनाची विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही.

२६. वाहन भाडे तत्वावर लावणेत आले नंतर वाहनास कोणत्याही अपघात झाल्यास होणारे सर्व प्रकारच्या आर्थिक नुकसानीस वाहन मालक स्वत: जबाबदार राहील.

२७. दरपत्रक धारकास भाडेतत्वावर वाहनाचे अदा करण्यात येणाऱ्या देयकातून नियमानुसार टीडीएस व जीएसटी कपात करणेत येईल.

२८. कोणतीही दरपत्रक स्वीकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार तसेच अटी वाढविण्याचा किंवा अट शिथिल करणेबाबतचे सर्व अधिकार साखर आयुक्त यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

२९. पुरवठाधारकाने पुरविलेल्या वाहनाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार साखर आयुक्त, पुणे यांचेकडे राहील.

३०. नेमुन दिलेल्या कालावधी दरम्यान वाहनांचे संपणारे टॅक्स व विमा अद्यावत करुन देण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील. सदर कागदपत्रे वेळावेळी पूर्ण करण्यास वाहन मालकाने टाळाटाळ केल्यास होणाऱ्या सर्व कायदेशीर/आर्थिक नुकसानीस वाहन मालक सर्वस्वी जबाबदार राहील.

३१. पुरवठादाराने पुरवठा केलेल्या वाहनाची मूदत कार्यारंभ आदेश दिलेचे दिनांकापासून किमान १ वर्ष या कालावधीपर्यंत राहील.

३२. सदर आदेशाची मुदत कधीही व कोणतेही कारण न दाखविता संपुष्टात आणणेचे किंवा मुदतवाढ देणेचे अधिकार साखर आयुक्त, पुणे यांचेकडे राखून ठेवणेत येत आहेत.

३३. पुरवठाधारकाने फॉर्म उघडणेच्यावेळी मुळ कागदपत्रे संच सोबत आणावा.

वरील १ ते ३३ अटी पूर्ण करणाऱ्या व कमी दरामध्ये वाहन उपलब्ध करुन देणाऱ्या दरपत्रकधारकास प्राधान्य देणेत येईल.

Signed by Sidharam
Karbasayya Salimath
Date: 07-05-2025 12:56:42

(सिध्दाराम सालीमठ)
साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, पुणे